Literacy for a Billion

Movie: Jamla Ho Jamla
Year: 1995

Song: Gardi madhuni Vaat Kadhuni
Lyricist: Jagdish Khebudkar

गर्दी मधुनी वाट काढूनी
अवचित तो गं आला
दंड पकडूनी मला ओढलं
चुडा थरारूनी गेला
काल राती जत्रंमधी
तो गं मला भावला
काल राती जत्रंमधी
तो गं मला भावला
जातो आता भेटाया
मी जीव त्याला लावला
त्याच्या बाई इश्काचा गं
विंचू मला चावला
आहा ओहो
आहा ओहो आहा आहा

तो डंख बाई हाय जीव घेई
बैचेन मी गं समजेना काही आता
मी साधी भोळी रातीच्या वेळी
भुलले कशी गं
कललेना जाता जाता
हात धरूनी त्यानं गं
काटयानं काटा काढला
हात धरूनी त्यानं गं
काटयानं काटा काढला
त्याच्या बाई इश्काचा गं
विंचू मला चावला
आहा ओहो

आहा ओहो आहा आहा...

विळखा तयाचा होता विखारी
अंगात माझ्या केवडाच बहरून येई
मी मोहरलेली मी बावरलेली
मनी हुरहुर होती तरी सावरले मी बाई
जवळ त्याला घेऊनी
मदनाचा मंतर मारला
जवळ त्याला घेऊनी
मदनाचा मंतर मारला
त्याच्या बाई इश्काचा गं
विंचू मला चावला
आहो आहा
आहा ओहो ओहो आहो

आता गं त्याच्या वाचूनी
माझ्या जीवाला चैन नाही हो...
लाजेनं चूर झाले मी
काया दरवळते त्याची जाई हो...
जमलं हो जमलं जोडीचं
नातं गोडीचं त्याच्या संग
शालू हा आले नेसून
त्याच्या आवडीचा ज्याचा रंग
होय होय होय होय होय होय
आज त्याच्या नावाचा मी
हिरवा चुडा घातला
हो आज त्याच्या नावाचा मी

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*

हिरवा चुडा घातला
त्याच्या बाई इश्काचा गं
विंचू मला चावला

आहा ओहो
आहा ओहो आहा आहा...

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*